**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुख्यालयाकरिता दैनंदिन कामकाजाकरिता आवश्यक असलेली अत्याधुनिक कृष्ण-धवल (Black and White) दोन नग आणि एक नग कलर झेरॉक्स असे एकूण तीन झेरॉक्स मशिन खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : मावज-२०२६/प्र.क्र.९२/मावज-१**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : - १६ जून, २०२६.

<u>वाचा</u> :- १) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.लेसाभां/झेरॉक्स यंत्रणा खरेदी/ का-१/३७८, दि. ४ जून, २०२६

२) मा. मुख्य सचिव यांचे अ.शा. पत्र क्र. भांखस-२०२५/प्र.क्र.१७४/उद्योग-४, दि. २० ऑगस्ट, २०२५

**प्रस्तावना-:**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुख्यालयाकरिता दैनंदिन कामकाजाकरिता आवश्यक असलेली अत्याधुनिक कृष्ण-धवल (Black and White) दोन नग आणि एक नग कलर झेरॉक्स असे एकूण तीन झेरॉक्स मशिन खरेदी करण्याबाबतच्या संदर्भाधीन दि.४ जून २०२६ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन दि. ४ जून, २०२६ चा प्रस्ताव विचारात घेऊन माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुख्यालयाकरिता दैनंदिन कामकाजाकरिता आवश्यक असलेली अत्याधुनिक कृष्ण-धवल (Black and White) दोन नग आणि एक कलर असे एकूण तीन झेरॉक्स मशिन खरेदीस येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | झेरॉक्स यंत्रणा तपशिल / Sr.No. | खरेदी नग |
|---|---|---|
| १ | (Black & White / laser Toner) with Display<br>ADF (Automatic Document Feader), Automatic Duplex Paper, Network with Wifi, २ Tray, Speed Per Minute ३०, Moveable Trolley, Printing Size A३, A४ Legal Paper ४ GB Ram, | २ |
| २ | (Color / laser Toner) with Display<br>ADF (Automatic Document Feader), Automatic Duplex Paper, Network with Wifi, २ Tray, Speed Per Minute २६, Moveable Trolley, Printing Size A३, A४ Legal Paper ६ GB Ram, with Wifi | १ |

२. संदर्भाधीन दि. ४ जून, २०२६ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: विसप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-१ उपविभाग-२, अनुक्रमांक २६-अ, नियम क्र. ७६ नुसार प्रशासकीय विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार तसेच त्यातील अटींचे पालन करण्याच्या तसेच

प्रस्तावात नमूद बाबींवरच खर्च करण्याच्या अटींच्या अधीन राहून प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

४. सदरची खरेदी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग तसेच वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी. संदर्भाधीन दि. २० ऑगस्ट, २०२५ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (Gem) पोर्टलवरुन खरेदी करणेबाबतच्या धोरणाचे पालन करण्यात यावे.

५. प्रस्तुतचा खर्च सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र.-ए-६, २२२०-माहिती व प्रसिध्दी, ०१-चित्रपट, ००१, संचालन व प्रशासन (००) (०१) प्रसिध्दी संचालक (अनिवार्य), १३-कार्यालयीन खर्च (संगणक सांकेतांक क्र. २२२०००४३) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक २०२६०६१६१३१८४९६८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SARIKA UTTAM PATIL

Digitally signed by SARIKA UTTAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=aa374b566d78c73e42804a2013f949268134e97ca9f7b2458c4247baf4c72175, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6401C88A0E0E14D8299DD0F14BA71419FCC6EE4670C193CBF1EB58127FA5947D, cn=SARIKA UTTAM PATIL
Date: 2026.06.16 13:19:35 +05'30'

**( सारिका उ. पाटील )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

**प्रत,**

१) मा. प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
२) सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) सहसचिव/उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) संचालक, (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५) महालेखापाल, १/२(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर
६) उपसंचालक, लेखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
९) लेखाधिकारी (आहरण व संवितरण),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई. (२ प्रती)
१०) लेखाधिकारी (अर्थसंकल्प), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई
११) निवडनस्ती (मावज-१) सामान्य प्रशासन विभाग.